# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.महिला व बालकल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक-५
## सभावृत्तांत

दिनांक- ११/११/२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ११/११/२००९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
५. मा.उबाळे वैशाली संजय
६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
८. मा.आशा अंकुश लांडगे

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक- २) महिलांसाठी व्यायामशाळा बांधणेबाबत-मा.सुषमा गावडे, मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३) महिलांसाठी व्यायामशाळा बांधणेबाबत-मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.वैशाली उबाळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४) पवनाथडी जत्रा या प्रदर्शनाचे आयोजन करणेबाबत-मा.ज्योती भारती, मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ५) महिलांसाठी व्यायामशाळा बांधणेबाबत-मा.आशा लांडगे, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ६) मुलींसाठी सॅनीटरी नॅपकीन मोफत देणेबाबत-मा.ज्योती भारती, मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव...

------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.वैशाली उबाळे अनुमोदक : मा.ज्योती भारती

सोमवार दिनांक १६/११/२००९ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

मा.सभापती- सोमवार दि.१६/११/२००९ रोजी दुपारी २:०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

------------

(सुजाता सुनिल लोखंडे)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक-५
सभावृत्तांत
(दिनांक ११/११/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक- १६/११/२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची दिनांक ११/११/२००९ ची तहकुब सभा सोमवार दिनांक १६/११/२००९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
५. मा.उबाळे वैशाली संजय
६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
७. मा.आशा अंकुश लांडगे

याशिवाय मा.चाकणकर-उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.आशा लांडगे अनुमोदक : मा.चंद्रकांता सोनकांबळे

गुरूवार, दिनांक १९/११/२००९ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

मा.सभापती- गुरूवार, दि.१९/११/२००९ रोजी दुपारी २:०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(सुजाता सुनिल लोखंडे)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा. महिला व बालकल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक-५
## सभावृत्तांत
(दिनांक ११/११/२००९ व १६/११/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक- १९/११/२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची दिनांक १६/११/२००९ ची तहकुब सभा गुरूवार, दिनांक १९/११/२००९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
५. मा.उबाळे वैशाली संजय
६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
८. मा.आशा अंकुश लांडगे

याशिवाय मा.फडणीस-सहाय्यक आयुक्त, मा.चाकणकर-उपनगरसचिव व मा.जगताप-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

दिनांक ९/९/२००९ व १४/१०/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक- ६ विषय क्रमांक- १
दिनांक- १९/११/२००९ विभाग-नागरवस्ती विकास योजना
सूचक- मा.शकुंतला धराडे अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/६/कावि/१६७७/०९ दि.२६/१०/०९

विषय- मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल) पुणे या संस्थे मार्फत प्रशिक्षण देणेबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले</u>-

ठराव क्रमांक- ७ विषय क्रमांक- २
दिनांक- १९/११/२००९
सूचक- मा.सुषमा गावडे अनुमोदक- मा.ज्योती भारती
संदर्भ-मा.सुषमा गावडे, मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव..

वॉर्ड क्र.१०० कासारवाडी येथे आरक्षण क्र.२४ येथील स्विंमिंगपूल येथे महिलांसाठी व्यायामशाळा आधुनिक सुसज्ज उपकरणांसहीत बांधणेकामी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- ८ विषय क्रमांक- ३
दिनांक- १९/११/२००९
सूचक- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक- मा.वैशाली उबाळे
संदर्भ-मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.वैशाली उबाळे यांचा प्रस्ताव..

दापोडी वॉर्ड क्र.१०४ मधील सिध्दार्थनगर येथे महिलांना व्यायामशाळा बांधण्यासाठी महिला व बालकल्याण समिती मधुन तरतूद करण्यास व आधुनिक सुसज्ज अशी उपकरणे मिळणेकामी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- ९ विषय क्रमांक- ४
दिनांक- १९/११/२००९
सूचक- मा.ज्योती भारती अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ-मा.ज्योती भारती, मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव..

नागरवस्ती विकास योजना विभागाच्या महिला बाल कल्याण योजने अंतर्गत बचतगटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंची विक्री व्हावी, त्यांना विपणन व विक्री कलेचे ज्ञान व्हावे या हेतूने दरवर्षी डिसेंबर महिन्यात पवनाथडी जत्रा हे वस्तु विक्री प्रदर्शन भरविण्यात येते, यावर्षी देखील “पवनाथडी जत्रा” या प्रदर्शनाचे आयोजन दि.२०/१२/०९ ते २६/१२/०९ या कालावधीत करण्यास व त्याकामी येणाऱ्या र.रू.५०,००,०००/- च्या खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समिती कडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- १०  विषय क्रमांक- ५
दिनांक- १९/११/२००९
सूचक- मा.आशा लांडगे  अनुमोदक- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ-मा.आशा लांडगे, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

वॉर्ड क्र२१ भोसरी येथे धावडेवस्ती, शिवगणेशनगर येथे महिलांसाठी व्यायामशाळा बांधणे व अत्याधुनिक, सुसज्ज उपकरणे बसविणे याकामासाठी महिला व बालकल्याण समिती मधुन र.रू.५०,००,०००/- ची तरतूद करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- ११  विषय क्रमांक- ६
दिनांक- १९/११/२००९
सूचक- मा.ज्योती भारती  अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ-मा.ज्योती भारती, मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव..

नागरवस्ती विकास योजना विभागाच्या महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या शाळेत इ.७ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी सॅनीटरी नॅपकीन दर महिन्याला मोफत उपलब्ध करून देण्यास तसेच मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने सदरचा विषय अतिशय महत्वाचा असल्याने त्या कामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समिती कडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सुजाता सुनिल लोखंडे)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/९/कावि/१२९५/०९
दिनांक- २३/११/२००९

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.